भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१

**(१९६१ चा अधिनियम क्रमांक ५२)**

[ १ मार्च, १९९९ रोजी यथाविद्यमान ]

# The Apprenticeship Act, 1961

**(Act No. 52 of 1961)**

*[As in force on the 1st March, 1999]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००२

[किंमत : रु. ६.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि एप्रेन्टिसशिप ॲक्ट, १९६१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १०, अंक २, दिनांक २६ ऑक्टोबर, १९९९ यात पृष्ठ २२८ ते २४३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २६ ऑक्टोबर, १९९९.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Apprenticeship Act, 1961 as on the 1st March 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 10 dated 26th October, 1999 on pages 228 to 243.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 Clause (a) of the Authoritative Texrs (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 26th October, 1999.

Dr. RAGHBIR SINGH
Secretary to the
Government of India.

# शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१

## कलमांचा क्रम

### प्रकरण पहिले

#### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

२. व्याख्या.

### प्रकरण दुसरे

#### शिकाऊ उमेदवार आणि त्यांचे प्रशिक्षण

३. शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतले जाण्यासाठी अर्हता.

३क. निर्देशित उद्योगांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित वन्यजमाती यांच्यासाठी प्रशिक्षणाच्या जागा राखून ठेवणे.

४. शिकाऊ उमेदवारीची संविदा.

५. शिकाऊ उमेदवारीच्या संविदेचे नूतनीकरण.

६. शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी.

७. शिकाऊ उमेदवारीच्या संविदेची समाप्ती.

८. निर्देशित उद्योगासंबंधात शिकाऊ उमेदवारांची संख्या.

९. शिकाऊ उमेदवारांचे प्रात्यक्षिक आणि पायाभूत प्रशिक्षण.

१०. शिकाऊ उमेदवारांचा संबद्ध शिक्षणक्रम.

११. नियोक्त्यांची आबंधने.

१२. शिकाऊ उमेदवारांची आबंधने.

१३. शिकाऊ उमेदवारांना वेतन देणे.

१४. शिकाऊ उमेदवारांचे आरोग्य, सुरक्षितता व कल्याण.

१५. कामाचे तास, अतिकालिक काम, रजा व सुट्ट्या.

१६. इजेबद्दल भरपाई देण्याबाबतचे नियोक्त्याचे दायित्व.

१७. वर्तणूक व शिस्त.

१८. शिकाऊ उमेदवार हे प्रशिक्षार्थी आहेत, कामगार नव्हेत.

१९. नोंदी व प्रतिवेदने.

२०. तंटे मिटवणे.

२१. चाचणी घेणे व प्रमाणपत्र देणे आणि प्रशिक्षणाची समाप्ती.

२२. नोकरी देणे व स्वीकारणे.

### प्रकरण तिसरे

#### प्राधिकरणे

२३. प्राधिकरणे.

२४. परिषदा घटित करणे.

२५. पदे रिक्त असल्यामुळे कृती व कार्यवाही विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.

२६. शिकाऊ उमेदवारी सल्लागार.

२७. उप आणि सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार.

२८. शिकाऊ उमेदवारी सल्लागार हे लोकसेवक असणे.

२९. प्रवेश निरीक्षण इत्यादींच्या शक्ती.

३०. अपराध व दंड.

३१. कोणताही खास दंड उपबंधित केलेला नसेल त्याबाबतीत दंड.

३२. कंपन्यांनी केलेले अपराध.

## कलमांचा क्रम

कलमे

३३. अपराधांची दखल घेणे.
३४. शक्तींचे प्रत्यायोजन.
३५. उल्लेखांचा अर्थ लावणे.
३६. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.
३७. नियम करण्याची शक्ती.
३८. (निरसित.)

अनुसूची

शब्दसूची : इंग्रजी–मराठी.
मराठी–इंग्रजी.

# शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१

**(१९६१ चा अधिनियम क्रमांक ५२)**

(१ मार्च, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[१२ डिसेंबर, १९६१]

**शिकाऊ उमेदवारांना * * * प्रशिक्षण देण्याबाबत विनियमन व नियंत्रण करण्यासंबंधी व त्यांच्याशी निगडीत असलेल्या बाबींसंबंधी उपबंध करण्यासाठी अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास "शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [१]* * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३] दिनांकास तो अंमलात येईल; आणि वेगवेगळ्या राज्यासाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

(४) या अधिनियमाचे उपबंध,—

(क) केंद्र सरकारने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्याला उक्त उपबंध, अधिसूचनेत नमूद करण्यात येईल त्या दिनांकापासून लागू होतील असे क्षेत्र किंवा उद्योगधंदा म्हणून विनिर्दिष्ट न केलेल्या अशा कोणत्याही क्षेत्राला किंवा कोणत्याही क्षेत्रातील अशा कोणत्याही उद्योगधंद्याला;

[४][ (ख) * * * * *]

[५][ (ग) केंद्र सरकार **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील अशी शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबतची जी कोणतीही विशेष शिकाऊ उमेदवारी योजना असेल तिला,]

लागू होणार नाहीत.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

[६][ (क) "अखिल भारतीय परिषद" याचा अर्थ, भारत सरकारच्या शासन निर्णय, भूतपूर्व शिक्षण मंत्रालय, क्र. एफ. १६-१०/४४-ई-तीन, दिनांक ३० नोव्हेंबर, १९४५ याअन्वये स्थापन केलेली "अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद", असा आहे;]

[७][ (कक)] "शिकाऊ उमेदवार" याचा अर्थ, जी व्यक्ती शिकाऊ उमेदवारीच्या संविदेनुसार शिकाऊ उमेदवार म्हणून [८]* * * प्रशिक्षण घेत आहे ती व्यक्ती, असा आहे;

[९][ (ककक) "शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण" याचा अर्थ, शिकाऊ उमेदवार संविदेनुसार आणि विहित अटी व शर्ती यांखाली कोणत्याही उद्योगधंद्यामध्ये किंवा आस्थापनेमध्ये घेतला जाणारा प्रशिक्षणक्रम, असा आहे—शिकाऊ उमेदवारांच्या वेगवेगळ्या वर्गाच्या बाबतीत त्या अटी व शर्ती वेगवेगळ्या असू शकतील;]

(ख) "शिकाऊ उमेदवारी सल्लागार" याचा अर्थ, कलम २६–पोटकलम (१) खाली नियुक्त केलेला केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) खाली नियुक्त केलेला राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार, असा आहे;

(ग) "शिकाऊ उमेदवारी परिषद" याचा अर्थ, कलम २४–पोटकलम (१) खाली स्थापन केलेली केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद किंवा राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद, असा आहे;

(घ) "समुचित शासन" याचा अर्थ—

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम २ द्वारे वगळण्यात आले.

२. १९६८ चा अधिनियम २५, कलम २ व अनुसूची (जेव्हा अधिसूचित केली) याद्वारे वगळण्यात आले.

३. १ मार्च, १९६२. पहा.—अधिसूचना क्र. जी.एस.आर. २४६, दिनांक १२ फेब्रुवारी, १९६२ गॅझेट ऑफ इंडिया, १९६२, भाग दोन, उपविभाग ३ (एक), इंग्रजी पृष्ठ २१८.

४. १९७३ चा अधिनियम २७, कलम ३ द्वारे वगळण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ग) ऐवजी घातले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे खंड (ककक) घालण्यात आला आणि कलम ४ द्वारे खंड (क) ला खंड (कक) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "उदीमांचे" हा शब्द गाळण्यात आला.

९. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे घालण्यात आले.

(१) (क्) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेच्या; किंवा

[1][(कक्) प्रादेशिक मंडळे; किंवा

(कक्क्) पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार किंवा तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या; किंवा;]

(ख्) कोणतीही रेल्वे, मोठे बंदर, खाण किंवा तेलक्षेत्र यांच्या कोणत्याही आस्थापनेच्या;

(ग्) (एक) केंद्र सरकार किंवा केंद्र सरकारचा एखादा विभाग;

(दोन) जीमध्ये एक्कावन्न टक्क्यांहून कमी नाही इतके भागभांडवल केंद्र शासनाने अथवा अंशत: त्या शासनाने व अंशत: एका किंवा अधिक राज्य शासनांनी धारण केले असेल अशी कंपनी;

(तीन) केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन झालेला केंद्र सरकारच्या मालकीचा किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थापनाखाली असलेला एखादा निगम (सहकारी संस्था धरून)

याच्या मालकीच्या, त्याच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात केंद्र सरकार, असा आहे;

(२) (क्) राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेच्या, किंवा

(ख्) त्या खंडाच्या उपखंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आस्थापनेहून अन्य कोणत्याही आस्थापनेच्या;

संबंधात राज्य शासन, असा आहे;

[2][(घघ्) "तंत्र शिक्षण मंडळ किंवा राज्य परिषद" याचा अर्थ, राज्य शासनाने स्थापन केलेले तंत्र शिक्षण मंडळ किंवा राज्य परिषद, असा आहे; ]

(ङ्) "निर्देशित उदीम" याचा अर्थ, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेशी विचारविनिमय करून नंतर केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, निर्देशित उदीम म्हणून विनिर्दिष्ट करील असा [2][कोणताही उदीम किंवा व्यवसाय अथवा असे अभियांत्रिकी विज्ञान किंवा तंत्रविज्ञान [1][किंवा कोणताही व्यावसायिक पाठ्यक्रम] यांमधील कोणत्याही विषयाचे व्यवहारक्षेत्र, असा आहे; ]

(च्) "नियोक्ता" याचा अर्थ, जी व्यक्ती एखाद्या आस्थापनेमध्ये कोणतेही काम करण्यासाठी एका किंवा अधिक अन्य व्यक्तींना पारिश्रमिकाच्या बदल्यात कामाला लावेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात अशा आस्थापनेतील कामगारांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम जिच्यावर सोपविले असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;

(छ्) "आस्थापना" यामध्ये, जेथे कोणताही उद्योगधंदा चालविला जातो त्या कोणत्याही जागेचा समावेश आहे; [4][आणि जेथे आस्थापने अंतर्गत भिन्न विभाग किंवा शाखा स्थापन करण्यात आलेल्या असतील—मग त्या त्याच ठिकाणी असोत किंवा निरनिराळ्या ठिकाणी असोत, तेथे असे सर्व विभाग किंवा शाखा त्या आस्थापनेचा भाग असल्याचे समजण्यात येईल.]

(ज्) "खाजगी क्षेत्रातील आस्थापना" याचा अर्थ, जी सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना नाही ती आस्थापना, असा आहे;

(झ्) "सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना" याचा अर्थ,—

(१) शासन किंवा शासनाचा एखादा विभाग;

(२) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १)—कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शासकीय कंपनी;

(३) केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्यकृत अधिनियमांद्वारे किंवा त्याखाली स्थापन झालेला शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील निगम (सहकारी संस्था धरून);

(४) स्थानिक प्राधिकरण,

याच्या मालकीची त्याच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील आस्थापना, असा आहे;

[5][(ञ्) "पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार" याचा अर्थ, जो उमेदवार अभियांत्रिकी किंवा तंत्रविज्ञान यामधील शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेने बहाल केलेली पदवी किंवा पदविका अथवा समतुल्य अर्हता धारण करतो किंवा ती धारण करता यावी म्हणून प्रशिक्षण घेत आहे आणि अभियांत्रिकी विज्ञानातील किंवा तंत्रविज्ञानातील विहित करण्यात येईल अशा कोणत्याही विषयाच्या व्यवहारक्षेत्रात शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण घेतो तो शिकाऊ उमेदवार, असा आहे;

१. १९८६ चा अधिनियम ४१, कलम २ (एक) द्वारे घालण्यात आले.
२. १९७३ चा अधिनियम २७, कलम ४ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घालण्यात आले.
३. १९८६ चा अधिनियम ४१, कलम २ (दोन) द्वारे घालण्यात आले.
४. १९९७ चा अधिनियम ४, कलम २ (एक) द्वारे घालण्यात आले.
५. १९७३ चा अधिनियम २७, कलम ४ (पाच) द्वारे घालण्यात आले.

(ट) "उद्योगधंदा" याचा अर्थ, ज्यामध्ये कोणताही उदीम, व्यवसाय अथवा अभियांत्रिकी किंवा तंत्रविज्ञान [1][किंवा कोणताही व्यावसायिक पाठ्यक्रम] यामधील विषयाचे व्यवहारक्षेत्र हे निर्देशित उदीम म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येईल असा कोणताही उद्योग किंवा धंदा, असा आहे ; ]

(ठ) "राष्ट्रीय परिषद" याचा अर्थ, शासन निर्णय, भारत सरकार, श्रम मंत्रालय (महासंचालक, पुनर्वसन व सेवायोजन) क्र. टी.आर./इ.पी.–२४/५६, दिनांक २१ ऑगस्ट, १९५६ द्वारे स्थापन केलेली [2][आणि शासन निर्णय, भारत सरकार, श्रम मंत्रालय (महासंचालक, सेवायोजन व प्रशिक्षण) क्र. डी.जी इ.टी./१२/२१/८०-टी.सी., दिनांक ३० सप्टेंबर, १९८१ द्वारे राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषद म्हणून नवीन नाव दिलेली] व्यावसायिक उदीम प्रशिक्षण राष्ट्रीय परिषद, असा आहे;

(ड) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

[3][(डड) "प्रादेशिक मंडळ" याचा अर्थ, 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली मुंबई, कलकत्ता, मद्रास किंवा कानपूर येथे नोंदणी झालेले कोणतेही शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण मंडळ, असा आहे ; ]

(ढ) "राज्य" यामध्ये संघ राज्यक्षेत्राचा समावेश आहे ;

(ण) "राज्य परिषद" याचा अर्थ, राज्य शासनाने स्थापन केलेली व्यावसायिक उदीम प्रशिक्षण राज्य परिषद, असा आहे ;

(त) "राज्य शासन" याचा संघ राज्य क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक, असा आहे;

[4][(तत) "तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार" याचा अर्थ, जो उमेदवार, माध्यमिक शालेय शिक्षणाचा टप्पा पूर्ण केल्यानंतरचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम अंतर्भूत असलेल्या व्यावसायिक पाठ्यक्रमाचे अखिल भारतीय परिषदेद्वारे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र धारण करतो किंवा ते धारण करता यावे म्हणून प्रशिक्षण घेत आहे आणि व्यावसायिक पाठ्यक्रमातील, विहित करण्यात येईल अशा कोणत्याही विषयात शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण घेत आहे, असा आहे; ]

[5][(थ) "उदीम शिकाऊ उमेदवार" याचा अर्थ, विहित करण्यात येईल अशा कोणत्याही उदीमामध्ये किंवा व्यवसायात शिकाऊ उमेदवार म्हणून जो प्रशिक्षण घेत आहे तो शिकाऊ उमेदवार, असा आहे.]

[6][(द) "कामगार" याचा अर्थ, कोणत्याही प्रकारच्या कामामध्ये वेतनावर कामाला ठेवण्यात आलेली आणि जिला थेट नियोक्त्याकडून वेतन देण्यात येत असेल अशी व्यक्ती असा आहे, परंतु त्यामध्ये, खंड (कक) मध्ये नमूद करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवारांचा समावेश नाही.]

## प्रकरण दोन

### शिकाऊ उमेदवार आणि त्यांचे प्रशिक्षण

**शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतले जाण्यासाठी अर्हता.**

३. एखादी व्यक्ती—

(क) ती चौदा वर्षांहून कमी वयाची नाही, आणि

(ख) विहित करण्यात येईल अशा दर्जाची शैक्षणिक पात्रता किंवा शारीरिक पात्रता तिच्याकडे आहे, असे असल्याशिवाय ती कोणत्याही निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतली जाण्यास अर्ह होणार नाही :

परंतु, वेगवेगळ्या निर्देशित उदीमांमधील शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाच्या संबंधात [5][व वेगवेगळ्या शिकाऊ उमेदवार वर्गांकरिता] वेगवेगळा दर्जा विहित करता येईल.

**निर्देशित उदीमामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित अन्य-जनजाती यांच्यासाठी प्रशिक्षणाच्या जागा राखून ठेवणे.**

[7][३क. (१) प्रत्येक उदीमामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित वन्यजनजाती यांच्यासाठी प्रशिक्षणाच्या जागा नियोक्त्याला राखून ठेवाव्या लागतील [8][आणि एखाद्या आस्थापनेत एकापेक्षा अधिक निर्देशित उदीम असतील तर, अशा आस्थापनेतील सर्व निर्देशित उदीमांमधील शिकाऊ उमेदवारांच्या एकूण संख्येच्या आधारेही अशा शिक्षणाच्या जागा राखून ठेवाव्या लागतील.]

(२) पोटकलम (१) खाली अनुसूचित जाती व अनुसूचित वन्यजनजाती यांच्यासाठी राखून ठेवावे व यांच्या जागांची संख्या संबंधित राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित वन्यजनजाती यांची लोकसंख्या लक्षात घेऊन विहित करण्यात येईल तितकी असेल.

---

१. १९८६ चा अधिनियम ४१, कलम २ (दोन) द्वारे घालण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २ (तीन) द्वारे घालण्यात आले.
३. १९७३ चा अधिनियम २७, कलम ४ (सहा) द्वारे घालण्यात आले.
४. १९८६ चा अधिनियम ४१, कलम २ (चार) द्वारे घालण्यात आले.
५. १९७३ चा अधिनियम २७, कलम ४ (सात) द्वारे घालण्यात आले.
६. १९९७ चा अधिनियम ४, कलम २(दोन) द्वारे नव्याने दाखल करण्यात आले.
७. १९७३ चा अधिनियम २७, कलम ५ द्वारे घालण्यात आले.
८. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे जादा दाखल करण्यात आले.
९. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ५ द्वारे जादा दाखल करण्यात आले.

स्पष्टीकरण.—या कलमात "अनुसूचित जाती" व "अनुसूचित जनजाती" या शब्दप्रयोगांना संविधानाचा अनुच्छेद ३६६–खंड (२४) व (२५) यामध्ये दिल्याप्रमाणे अर्थ असेल.]

शिकाऊ उमेदवारीची संविदा.

४. [(१) कोणत्याही व्यक्तीने किंवा ती अज्ञान असल्यास तिच्या पालकाने नियोक्त्याशी शिकाऊ उमेदवारीची संविदा केल्याखेरीज तिला कोणत्याही निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतले जाणार नाही.

(२) ज्या दिनांकास पोटकलम (१) खालील शिकाऊ उमेदवारीची संविदा केली गेली असेल त्या दिनांकापासून शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण सुरू झाले असे मानण्यात येईल.

(३) प्रत्येक शिकाऊ उमेदवारी संविदेमध्ये संविदेमधील पक्षांना संमत होतील अशा अटी व शर्ती अंतर्भूत असतील :

परंतु, अशी कोणतीही अट किंवा शर्त या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाशी किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाशी विसंगत असणार नाही.

(४) पोटकलम (१) खाली केलेली प्रत्येक शिकाऊ उमेदवारी संविदा नियोक्त्याला विहित करण्यात येईल अशा कालावधीमध्ये शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडे नोंदणीसाठी पाठवावी लागेल.

(५) शिकाऊ उमेदवारी संविदेमध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून वर्णन केलेली व्यक्ती संविदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण घेण्यासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून ठेवून घेतली जाण्यास या अधिनियमाखाली अर्ह आहे याबाबत शिकाऊ उमेदवारी सल्लागाराचे समाधान झाल्याखेरीज तो त्या संविदेची नोंदणी करणार नाही.

(६) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेतल्यानंतर, जेव्हा केंद्र सरकार, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांच्या कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारी प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती बदलणारा कोणताही नियम करील, तेव्हा शिकाऊ उमेदवारांच्या त्या प्रवर्गाशी संबंधित असलेल्या व असा नियम करण्याच्या लगतपूर्वी विद्यमान असलेल्या शिकाऊ उमेदवारी संविदेच्या अटी व शर्ती तदनुसार आपरिवर्तित झाल्या असे मानण्यात येईल.]

शिकाऊ उमेदवारीच्या संविदेचे नूतनीकरण.

५. ज्याच्याशी शिकाऊ उमेदवारीची संविदा करण्यात आली आहे असा नियोक्ता, कोणत्याही कारणास्तव संविदेखालील आपली आबंधने पार पाडण्यास असमर्थ असेल आणि शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाच्या कालावधीपैकी उर्वरित काळात शिकाऊ उमेदवाराला अन्य एखाद्या नियोक्त्याच्या हाताखाली शिकाऊ उमेदवार म्हणून ठेऊन घेण्यात यावे असा करार नियोक्ता, शिकाऊ उमेदवार किंवा त्याचा पालक आणि तो दुसरा नियोक्ता यांच्यामध्ये शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या मान्यतेने झाला असेल तर, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडे नोंदणी झाल्यानंतर तो करार म्हणजे शिकाऊ उमेदवार किंवा त्याचा पालक आणि तो दुसरा नियोक्ता यांच्यामधील शिकाऊ उमेदवारीची संविदा असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा नोंदणीच्या दिनांकी व तेव्हापासून पहिल्या नियोक्त्यावरोबर झालेली शिकाऊ उमेदवारीची संविदा संपुष्टात येईल आणि त्या संविदेखालील कोणतेही आबंधन संविदेतील कोणत्याही पक्षाच्या सांगण्यावरून त्यामधील दुसऱ्या पक्षाविरुद्ध बजावणीयोग्य असणार नाही.

शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी.

६. शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी शिकाऊ उमेदवारीच्या संविदेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल व तो पुढीलप्रमाणे असेल :—

(क) शाळेतून चालविलेल्या संस्थेचे प्रशिक्षण घेऊन अथवा राष्ट्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या एखाद्या शाळेतून किंवा अन्य संस्थेमधून संस्थाविहित प्रशिक्षण घेऊन जे [2][उदीम शिकाऊ उमेदवार] [3][त्या परिषदेने किंवा त्या परिषदेकडून मान्यता मिळालेल्या संस्थेने] घेतलेल्या उदीम-चाचण्यांमध्ये [4][किंवा परीक्षांमध्ये] उत्तीर्ण झालेले असतील त्यांच्या बाबतीत शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी हा त्या परिषदेने किंवा त्या परिषदेकडून मान्यता मिळालेल्या संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल;

[5][(कक) एखाद्या तंत्रशिक्षणविषयक मंडळाला किंवा राज्य परिषदेला किंवा केंद्र सरकार याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही प्राधिकरणाला संलग्न असलेल्या किंवा त्यांनी मान्यता दिलेल्या एखाद्या शाळेतून किंवा अन्य संस्थेमधून संस्थाविहित प्रशिक्षण घेऊन जे शिकाऊ उमेदवार, त्या मंडळाने किंवा राज्य परिषदेने किंवा प्राधिकरणाने घेतलेल्या उदीम-चाचण्यांमध्ये [4][किंवा परीक्षांमध्ये] उत्तीर्ण झालेले असतील त्यांच्या बाबतीत शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल;]

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम ७ द्वारे कलम ४ ऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ (एक) द्वारे "शिकाऊ उमेदवार" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८(एक) (४) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

४. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ५ द्वारे घातले.

५. १९७३ चा अधिनियम २७, कलम ८(दोन) द्वारे दाखल करण्यात आले.

(ख) अन्य [1][उदीम शिकाऊ उमेदवारांच्या] बाबतीत, शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी हा विहित केल्याप्रमाणे असेल;

[2][(ग) पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवारांच्या, [3][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवारांच्या] बाबतीत, शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी हा विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.]

**शिकाऊ उमेदवारीच्या संविदेची समाप्ती.**

७. (१) शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाची संविदा शिकाऊ उमेदवारीचा कालावधी संपताच समाप्त होईल.

(२) शिकाऊ उमेदवारीच्या संविदेतील कोणत्याही पक्षाला, संविदा समाप्त करण्यासाठी शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडे अर्ज करता येईल, आणि जेव्हा असा अर्ज करण्यात येईल तेव्हा त्याची एक प्रत तो पक्ष डाकेने संविदेतील दुसऱ्या पक्षाला पाठवील.

(३) अर्जातील मजकूर आणि अन्य पक्षाने दाखल केलेले काही आक्षेप असल्यास ते विचारात घेतल्यानंतर, जर संविदेतील दोन्ही पक्षांनी किंवा त्यांपैकी कोणाही एकाने संविदेतील अटी व शर्ती पार पाडण्यात कसूर केली आहे आणि तसेच संविदा समाप्त करणे हे दोन्ही पक्षांच्या किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही हिताच्या दृष्टीने इष्ट आहे याबाबत शिकाऊ उमेदवारी सल्लागाराची खात्री झाली तर, त्याला लेखी आदेशाद्वारे ती संविदा समाप्त करता येईल :

परंतु, जर—

(क) नियोक्त्याने संविदेच्या अटी व शर्ती पार पाडण्यात कसूर केल्याबद्दल संविदा समाप्त करण्यात आली असेल तर, नियोक्ता विहित असेल तितकी भरपाई शिकाऊ उमेदवाराला देईल;

(ख) अशी कसूर शिकाऊ उमेदवाराने केली असेल तर, शिकाऊ उमेदवार किंवा त्याचा पालक प्रशिक्षणाचा खर्च म्हणून शिकाऊ उमेदवारी सल्लागार ठरवील तेवढी रक्कम नियोक्त्याला परत करील.

[4][(४) ह्या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेथे शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, शिकाऊ उमेदवारी संविदा समाप्त करण्यात आली असेल आणि नव्या नियोक्त्याबरोबर नवीन शिकाऊ उमेदवार संविदा करण्यात आलेली असेल तेथे, पूर्वीच्या नियोक्त्या बरोबरची शिकाऊ उमेदवारी संविदा पूर्ण करणे, त्या नियोक्त्याच्या कोणत्याही कसुरीच्या कारणाने शक्य नव्हते अशी शिकाऊ उमेदवारी सल्लागाराची खात्री झाली असेल, तर तो नवीन नियोक्त्याकडील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये, त्याच्या पूर्वीच्या नियोक्त्याकडे त्या शिकाऊ उमेदवाराने अगोदरच जेवढा काळ शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेतले असेल तो कालावधी समाविष्ट करण्यास परवानगी देईल.]

**निर्देशित उदीमासंबंधात शिकाऊ उमेदवारांची संख्या.**

८. [5][(१) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेतल्यानंतर केंद्र सरकार, शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे प्रत्येक उदीमाच्या संबंधात, त्या उदीमामधील अकुशल कामगार सोडून अन्य कामगारांच्या संख्येशी शिकाऊ उमेदवारांचे प्रमाण निश्चित करील :

परंतु, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही नियोक्त्याला या पोटकलमाखाली निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त संख्येने शिकाऊ उमेदवार कामाला लावण्यास प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली प्रमाण ठरवताना केंद्र सरकार, संबंधित निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारांना या अधिनियमाखाली उपलब्ध असलेल्या सुविधा, तसेच काही पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार, [6][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार] असल्यास त्यांच्या संबंधात, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने किंवा पोटकलम (३क) मध्ये निर्देशित केलेल्या अशा अन्य व्यक्तीने त्या कलमाखाली नियोक्त्याला काढलेल्या कोणत्याही नोटिशीनुसार नियोक्त्याने त्या उमेदवारासाठी ज्या सुविधा उपलब्ध करायला हव्यात त्याही सुविधा विचारात घेईल.

(३) नियोक्त्याने त्याच्या आस्थापनेमध्ये कोणत्याही निर्देशित उदीमासाठी केंद्र सरकारने निश्चित केलेल्या प्रमाणानुसार असतील तेवढे उदीम शिकाऊ उमेदवार त्या उदीमात शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण घेण्यासाठी ठेवावेत अशी त्याला शिकाऊ उमेदवारी सल्लागार लेखी नोटिशीद्वारे आज्ञा करू शकेल आणि नियोक्ता अशा आज्ञेचे पालन करील :

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम ८(एक) द्वारे "शिकाऊ उमेदवार" यांच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८(पाच) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.

३. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३ (ख) द्वारे घातले.

४. १९९७ चा अधिनियम ४, कलम ३ द्वारे नव्याने दाखल केले.

५. १९७३ चा अधिनियम २७, कलम ९(१) द्वारे मूळ पोटकलम (१), (२) आणि (३) ऐवजी घातले.

६. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३(क) द्वारे घातले.

परंतु, या पोटकलमाखाली अशी कोणतीही आज्ञा करताना, शिकाऊ उमेदवारी सल्लागार संबंधित आस्थापनेमध्ये प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या सुविधा लक्षात घेईल.

[1][परंतु, आणखी असे की, शिकाऊ उमेदवारी सल्लागार, एखाद्या नियोक्त्याकडून त्याच्याकडे अभिवेदन करण्यात आल्यावर आणि सेवायोजनाची अधिक वास्तववादी उपलब्धता, प्रशिक्षण सुविधा व इतर संबंधित घटक विचारात घेऊन, निर्देशित उदीमासाठी त्या उदीमासाठी असलेल्या गुणोत्तराने काढलेल्या संख्येपेक्षा कमी असतील इतक्या परंतु अशा काढलेल्या संख्येच्या २० टक्यांपेक्षा कमी नसतील इतक्या शिकाऊ उमेदवारांना नोकरीत घेण्यास परवानगी देईल, मग नियोक्त्याने इतर उदीमांमध्ये, अशा तुटी इतक्या संख्येएवढे जादा शिकाऊ उमेदवार नोकरीस ठेवले पाहिजेत, अशा शर्तीच्या अधीन राहून ही परवानगी दिली जाईल.]

(३क) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार अथवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या दर्जाहून कमी दर्जा नसणारी अशी, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती पुढील गोष्टी, म्हणजे—

(एक) निर्देशित उदीमामध्ये कामाला असलेल्या व्यवस्थापक व्यक्तींची संख्या (तंत्रकुशल व पर्यवेक्षकीय व्यक्तींसह);

(दोन) आस्थापनेत ठेवलेल्या व्यवस्थापन-प्रशिक्षार्थींची संख्या;

(तीन) निर्देशित उदीमामध्ये उपलब्ध असणाऱ्या एकंदर प्रशिक्षणाच्या सुविधा; आणि

(चार) त्या त्या प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये स्वतःला योग्य वाटतील अशा अन्य गोष्टी; लक्षात घेतल्यानंतर नियोक्त्याला लेखी नोटीस पाठवून, त्याने आपल्या आस्थापनेत अशा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केला असेल अशा उदीमामध्ये विनिर्दिष्ट संख्येइतक्या पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवारांना, [2][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवारांना] प्रशिक्षण द्यावे अशी आज्ञा करील व नियोक्ता अशा आज्ञेचे पालन करील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमामध्ये "व्यवस्थापन-प्रशिक्षार्थी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, नियोक्त्याने ज्या व्यक्तीला त्याच्या आस्थापनेमध्ये प्रशिक्षणक्रम (या अधिनियमाखालील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण नव्हे) घेण्यासाठी, असे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर नियोक्ता त्या व्यक्तीला रीतसर कामावर ठेवील या शर्तीवर ठेवलेले आहे ती व्यक्ती, असा आहे].

(४) आपल्या हाताखालील शिकाऊ उमेदवारांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने अनेक नियोक्ते एकत्र मिळून आपापल्या आस्थापनांमध्ये त्यांना पाठवून प्रशिक्षण देऊ शकतील.

(५) सार्वजनिक हित लक्षात घेता, केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा अधिक [1][किंवा पोटकलम (३क) खाली काढलेल्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपेक्षा अधिक] शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षित करावयास हवे असे समुचित शासनाचे मत असेल तर, समुचित शासन अधिक शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षित करण्याबाबत, नियोक्त्यांना आज्ञा करू शकेल.

(६) जर अधिक शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला आवश्यक वाटतील अशा अधिक सुविधा आणि असे अधिक वित्तीय सहाय्य संबंधित शासनाने उपलब्ध करून दिले तर, ज्या नियोक्त्याला पूर्वोक्त अशी आज्ञा करण्यात आली असेल तो प्रत्येक नियोक्ता त्या आज्ञेचे पालन करील.

(७) शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने पोटकलम (६) खाली केलेल्या निर्णयाने ज्या नियोक्त्याचे समाधान झाले नसेल तो नियोक्ता, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेकडे ती बाब निर्णयार्थ निर्देशित करू शकेल आणि अशा निर्देशित बाबीवर त्या परिषदेने त्यासाठी नेमलेल्या तिच्या एखाद्या समितीकडून निर्णय दिला जाईल आणि त्या समितीचा निर्णय अंतिम असेल.

**शिकाऊ उमेदवारांचे प्रात्यक्षिक आणि पायाभूत प्रशिक्षण.**

९. (१) प्रत्येक नियोक्ता, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने मान्य केलेल्या कार्यक्रमानुसार त्याने ठेवलेल्या प्रत्येक शिकाऊ उमेदवाराला प्रात्यक्षिक प्रशिक्षणक्रम देण्यासाठी आपल्या कार्यशाळेत योग्य ती व्यवस्था करील.

(२) प्रत्येक शिकाऊ उमेदवाराच्या कामाची पारख करण्यासाठी आणि मान्य केलेल्या कार्यक्रमानुसार प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जात आहे याबद्दल खात्री करून घेण्यासाठी अशा प्रत्येक उमेदवाराची भेट घेता यावी या दृष्टीने [4][केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला अथवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेली जी व्यक्ती केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून या संबंधात लेखी प्राधिकृत झाली असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला] सर्व वाजवी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील :

१. १९९७ चा अधिनियम ४, कलम ४ द्वारे नव्याने दाखल केले.
२. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३(ख) द्वारे घातले.
३. १९७३ चा अधिनियम २७, कलम ९ (२) द्वारे घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम १०(१)(क)द्वारे "केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला" या शद्बांऐवजी घातले.

परंतु, ज्या आस्थापनांच्या संबंधात राज्य शासन हेच समुचित शासन आहे त्या आस्थापनांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांच्या बाबतीत, [1][राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेली जी व्यक्ती राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून या संबंधात लेखी प्राधिकृत झाली असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला देखील] अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

[2][(३) उदीम शिकाऊ उमेदवारांपैकी ज्यांनी राष्ट्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या एखाद्या शाळेतून किंवा अन्य संस्थेतून तंत्रशिक्षणविषयक मंडळाने किंवा राज्य परिषदेने किंवा केंद्र सरकार या बाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही प्राधिकरणाला संलग्न असलेल्या किंवा त्यांनी मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही संस्थेमधून संस्थाविहित प्रशिक्षण घेतलेले नसेल त्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी कार्यशाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी पायाभूत प्रशिक्षणक्रम शिकावा लागेल.]

(४) जर नियोक्त्याने आपल्या आस्थापनेत पाचशे किंवा त्याहून अधिक कामगार कामावर ठेवले असतील तर, [3][उदीम शिकाऊ उमेदवारांना] द्यावयाचे पायाभूत प्रशिक्षण हे एकतर कार्यशाळेच्या इमारतीच्या स्वतंत्र भागात दिले जाईल किंवा स्वतंत्र इमारतीमध्ये दिले जाईल व ती इमारत खुद्द नियोक्त्याला उभारावी लागेल, पण समुचित शासन, अशा स्वतंत्र इमारतीसाठी जमीन, बांधकाम व साधनसामग्री यांचा खर्च भागविण्यासाठी नियोक्त्याला सुलभ अटींवर आणि सुलभ हप्त्यांनी फेडावयाची कर्जे मंजूर करू शकेल.

[4][(४क) पोटकलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या आस्थापनेमध्ये पाचशे किंवा त्याहून अधिक कामगार कामावर ठेवलेले आहेत अशा कोणत्याही आस्थापनेमध्ये कोणत्याही वेळी प्रशिक्षित करावयाच्या शिकाऊ उमेदवारांची संख्या जर बारापेक्षा कमी असेल तर, अशा आस्थापनेच्या संबंधातील नियोक्ता त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उमेदवारांना कोणत्याही निर्देशित उदीमामधील पायाभूत प्रशिक्षणासाठी एखाद्या पायाभूत प्रशिक्षण केंद्रात किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत—दोन्ही शासनाने चालविलेल्या असाव्यात—प्रतिनियुक्त करू शकेल.

(४ख) जेव्हा एखादा नियोक्ता पोटकलम (४क) खाली कोणत्याही शिकाऊ उमेदवाराला प्रतिनियुक्त करील तेव्हा, असा नियोक्ता शासनाला अशा प्रशिक्षणासाठी करावा लागेल तो खर्च केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा दराने शासनाला देईल.]

(५) जर नियोक्त्याने आपल्या आस्थापनेत पाचशेपेक्षा कमी कामगार कामावर ठेवले असतील तर [3][उदीम शिकाऊ उमेदवारांना] शासनाने स्थापन केलेल्या प्रशिक्षण संस्थामधून पायाभूत प्रशिक्षण दिले जाईल.

(६) अशी कोणतीही प्रशिक्षण संस्था त्या स्थानिक भागातील सर्वाधिक योग्य आस्थापनेच्या वास्तुमध्ये अथवा अन्य कोणत्याही सोईस्कर ठिकाणी चालविली जाईल आणि दोन किंवा अधिक नियोक्त्यांनी ठेवलेल्या [3][उदीम शिकाऊ उमेदवारांना] तेथे पायाभूत प्रशिक्षण देण्यात येईल.

(७) [5][पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवाराहून [6][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवाराहून] अन्य शिकाऊ उमेदवाराच्या बाबतीत,] पायाभूत प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम आणि त्यासाठी वापरावयाची साधनसामग्री, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेऊन नंतर केंद्र सरकार मान्य करील त्याप्रमाणे असेल.

[5][(७क) पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवाराच्या [6][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवाराच्या] बाबतीत, अभियांत्रिकी विज्ञान किंवा तंत्रविज्ञान [6][किंवा व्यावसायिक पाठ्यक्रम] यामधील कोणत्याही विषयाच्या व्यवहारक्षेत्रातील [6][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार] शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आणि अशा प्रशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेऊन नंतर केंद्र सरकार मान्य करील त्याप्रमाणे असतील.]

(८) (क) कलम ६ च्या [7][खंड (क) आणि खंड (कक्) मध्ये निर्देशित केलेल्यांहून अन्य उदीम शिकाऊ उमेदवारांना [8][पायाभूत प्रशिक्षणासह] देण्याच्या संबंधात नियोक्त्याला येणारा आवर्ती खर्च (पाठ्यवेतनाचा खर्च धरून),—

---

१. १९७३ चा अधिनियम २७ कलम १० (१) (क्) द्वारे "केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला" या शब्दांऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) द्वारे पोटकलम (३) ऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ (एक) द्वारे "शिकाऊ उमेदवार" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १० (तीन) द्वारे घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १० (सहा) द्वारे घातले.

६. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३ (क) द्वारे घातले.

७. १९७३ चा अधिनियम २७, कलम १० (सात) व (आठ) (क्) द्वारे घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम १० (आठ) (ख्) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

९. १९९७ चा अधिनियम ४, कलम ५(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(एक) अशा नियोक्त्याने [1][दोनशे पन्नास] किंवा त्याहून अधिक कामगार कामावर ठेवलेले असल्यास त्या नियोक्त्याला;

(दोन) नियोक्त्याने [2][दोनशे पन्नास] पेक्षा कमी कामगार कामावर ठेवलेले असल्यास, केंद्र सरकार घालून देईल अशा मर्यादेपर्यंत नियोक्ता व शासन यांना समान प्रमाणात व त्या मर्यादेपलिकडे नियोक्त्याला एकट्याला,

सोसावा लागेल ;

(ख्) कलम ६ च्या [3][खंड (क्) आणि खंड (कक्) मध्ये निर्देशित केलेल्या उदीम शिकाऊ उमेदवारांच्या पायाभूत प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक प्रशिक्षण] देण्याच्या संबंधात नियोक्त्याला येणारा (पाठ्यवेतनाचा खर्च धरून) काही आवर्ती खर्च असल्यास तो प्रत्येक बाबतीत नियोक्त्याला सोसावा लागेल;

[4][(ग्) पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवारांना [5][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवारांना] प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्याच्या संबंधात नियोक्त्याला येणारा (पाठ्यवेतनाचा खर्च वगळून) आवर्ती खर्च नियोक्त्याला सोसावा लागेल आणि पाठ्यवेतनांचा खर्च केंद्र सरकार घालून देईल त्या मर्यादेपर्यंत केंद्र सरकार व नियोक्ता यांना समान प्रमाणात व त्या मर्यादेपलीकडे नियोक्त्याला एकट्याला सोसावा लागेल.]

शिकाऊ उमेदवारांचा संबद्ध शिक्षणक्रम.

१०. (१) [6][उदीम शिकाऊ उमेदवार] एखाद्या आस्थापनेत प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेत असेल त्या [6][उदीम शिकाऊ उमेदवाराला] कुशल कारागीर म्हणून पुरेपूर अर्हता प्राप्त होण्यासाठी त्याला आवश्यक ते तात्त्विक ज्ञान देण्याच्या हेतूने, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेऊन केंद्र सरकारने मान्य केलेला (जो त्या उदीमाला अनुरूप असेल असा) संबद्ध शिक्षणक्रम प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या कालावधीत त्याला शिकविला जाईल.

(२) संबद्ध शिक्षणक्रम समुचित शासनाच्या खर्चाने शिकविला जाईल, पण नियोक्त्याकडे मागणी करण्यात येईल तेव्हा तो असा पाठ्यक्रम शिकविण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देईल.

(३) संबद्ध शिक्षणक्रमाच्या वर्गांना हजर राहण्याकरिता [6][उदीम शिकाऊ उमेदवाराने] घालवलेला वेळ हा त्याच्या कामाच्या वैतनिक अवधीचा भाग असल्याचे समजण्यात येईल.

[7][(४) संस्थाविहित प्रशिक्षणक्रम घेऊन नंतर जे राष्ट्रीय परिषदेने चालविलेल्या उदीम-चाचण्या उत्तीर्ण झाले असतील अथवा तंत्रशिक्षणविषयक मंडळाने किंवा राज्य परिषदेने किंवा केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने चालविलेल्या उदीम-चाचण्या व परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील त्या उदीम-शिकाऊ उमेदवारांच्या बाबतीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे कमी केलेल्या किंवा बदललेल्या वेतनश्रेणीवर संबद्ध शिक्षणक्रम देता येईल.

(५) जर एखादी व्यक्ती, एखाद्या तंत्रशिक्षण संस्थेत आपला पाठ्यक्रम शिकत असताना, पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार [8][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार] झाली आणि आपल्या शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणक्रमात तिला संबद्ध शिक्षणक्रम शिकावा लागणार असेल तर, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार अथवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या ज्या व्यक्तीला केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार या संबंधात लेखी प्राधिकृत करील अशी अन्य कोणतीही व्यक्ती विनिर्दिष्ट करील अशा कालावधीपुरते नियोक्ता अशा व्यक्तीला त्या संस्थेत संबद्ध पाठ्यक्रम शिकण्यासाठी प्रात्यक्षिक प्रशिक्षणक्रमातून मोकळे करील.]

नियोक्त्यांची आबंधने.

११. या अधिनियमातील अन्य उपबंधांना बाध न येता, शिकाऊ उमेदवाराच्या बाबतीत, नियोक्त्यावर पुढील आबंधने राहतील, ती अशी :—

(क्) या अधिनियमाचे उपबंध व त्याखाली केलेले नियम यांनुसार शिकाऊ उमेदवाराला त्याच्या उदीमाचे प्रशिक्षण देणे ;

(ख्) जर खुद्द नियोक्त्याकडे त्या उदीमातील अर्हता नसेल तर, [9][जिच्याकडे विहित अर्हता असतील] त्या व्यक्तीवर शिकाऊ उमेदवाराला प्रशिक्षण देण्याची जबाबदारी टाकण्याची व्यवस्था करणे; [10][* * * * *]

---

१. १९७३ चा अधिनियम २७ कलम ५ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२ वरील अधिनियमाच्या कलम ५(तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १०(आठ) (ख) द्वारे मूळ मजकुरा एवजी घातले.
४. १९७३ चा अधिनियम, २७, कलम १० (आठ) (ख्) द्वारे घातले.
५. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३(ख्) द्वारे घातले.
६. १९७३ चा अधिनियम २७, कलम ११(एक) द्वारे "शिकाऊ उमेदवार" याच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.
७. वरील अधिनियमाच्या कलम ११(तीन) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.
८. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३(क्) द्वारे घातले.
९. १९७३ चा अधिनियम २७ कलम ११ द्वारे घातले.
१०. १९९७ चा अधिनियम ४, कलम ६(एक) द्वारे गाळण्यात आले.

[1][(खख) शिकाऊ उमेदवारांच्या उदीम चाचणीसाठी प्रात्यक्षिकांचे व सिद्धांतांचे प्रशिक्षण देण्यासाठी विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणारा पुरेसा निदेशक कर्मचारीवर्ग पुरविणे, आणि]

(ग) शिकाऊ उमेदवारीच्या संविदेखालील आपली आबंधने पार पाडणे.

१२. [2][(१)] शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेणाऱ्या [3][प्रत्येक उदीम शिकाऊ उमेदवारावर] पुढील आबंधने असतील, ती अशी :— शिकाऊ उमेदवारांची आबंधने.

(क) स्वत:चा उदीम मन:पूर्वक व कार्यासक्तीने शिकणे आणि प्रशिक्षणाचा कालावधी संपण्यापूर्वी कुशल कारागीर म्हणून अर्हता प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणे;

(ख) प्रात्यक्षिकांच्या व शिकवणीच्या वर्गांना नियमितपणे हजर राहणे;

(ग) आपला नियोक्ता व आस्थापनेतील वरिष्ठ यांच्या सर्व कायदेशीर आदेशांचे पालन करणे; आणि

(घ) शिकाऊ उमेदवारीच्या संविदेखालील आपली आबंधने पार पाडणे.

[4][(२) शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवारावर, [5][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवारावर] पुढील आबंधने असतील, ती अशी :—

(क) स्वत:च्या प्रशिक्षणाच्या जागी मन:पूर्वक व कार्यासक्तीने अभियांत्रिकी विज्ञान किंवा तंत्रविज्ञान [6][किंवा व्यावसायिक पाठ्यक्रम] यांमधील स्वत:च्या विषयाच्या व्यवहार क्षेत्रातील प्रशिक्षण घेणे;

(ख) प्रात्यक्षिकांच्या व शिकवणीच्या वर्गांना नियमितपणे हजर राहणे;

(ग) आपला नियोक्ता व आस्थापनेतील वरिष्ठ यांच्या सर्व कायदेशीर आदेशांचे पालन करणे ;

(घ) शिकाऊ उमेदवारीच्या संविदेखालील आपली आबंधने पार पाडणे—त्यामध्ये विहित करण्यात येईल त्याप्रमाणे आपल्या कामाच्या तशा नोंदी ठेवण्याचाही समावेश असेल.]

१३. (१) नियोक्ता, प्रत्येक शिकाऊ उमेदवाराला शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या कालावधीत किमान [7][विहित दर अथवा असा शिकाऊ उमेदवार ज्या प्रवर्गात मोडत असेल त्यातील उमेदवारांना १ जानेवारी, १९७० रोजी नियोक्त्याकडून ज्या दराने मोबदला दिला जात होता तो दर, यांपैकी जो अधिक असेल] त्या दरानुसार शिकाऊ उमेदवारीच्या संविदेत विनिर्दिष्ट केले जाईल असे पाठयवेतन देईल आणि याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेले पाठयवेतन विहित करण्यात येईल अशा कालांतरागणिक व अशा शर्तींवर देण्यात येईल. शिकाऊ उमेदवारांना वेतन देणे.

[8][(२) शिकाऊ उमेदवाराला त्याच्या नियोक्त्याकडून कामावारी तत्वावर वेतन दिले जाणार नाही. तसेच त्याला कोणत्याही उत्पादनसापेक्ष बोनसच्या किंवा अन्य प्रोत्साहन योजनेत सहभागी व्हावयास लावले जाणार नाही.]

१४. जेव्हा कोणतेही शिकाऊ उमेदवार कारखान्यामध्ये प्रशिक्षण घेत असतील तेव्हा, 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३)—प्रकरण तीन, चार व पाच यांचे उपबंध, जणू काही ते शिकाऊ उमेदवार त्या अधिनियमाच्या अर्थानुसार कामगार असावेत त्याप्रमाणे त्यांचे आरोग्य, सुरक्षितता व कल्याण यांच्या संबंधात लागू होतील आणि जेव्हा कोणतेही शिकाऊ उमेदवार खाणीमध्ये प्रशिक्षण घेत असतील तेव्हा, 'खाणी अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५)—प्रकरण पाच याचे उपबंध, जणू काही ते शिकाऊ उमेदवार म्हणजे खाणीमध्ये कामाला लावलेल्या व्यक्ती असाव्यात त्याप्रमाणे त्यांचे आरोग्य सुरक्षितता, व कल्याण यांच्या संबंधात लागू होतील. शिकाऊ उमेदवारांचे आरोग्य, सुरक्षितता व कल्याण.

१५. (१) कार्यशाळेमध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेत असताना शिकाऊ उमेदवाराचे आठवड्याचे व दैनिक कामाचे तास विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. कामाचे तास, अतिकालिक काम, रजा व सुट्या.

(२) कोणत्याही शिकाऊ उमेदवारास शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या मान्यतेखेरीज जादा वेळ काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही आणि असे जादा वेळ काम करणे हे शिकाऊ उमेदवाराच्या प्रशिक्षणाच्या हिताचे आहे किंवा सार्वजनिक हिताचे आहे असे स्वत:चे समाधान झाल्याखेरीज तो शिकाऊ उमेदवारी सल्लागार अशी मान्यता देणार नाही.

---

१. १९७९ चा अधिनियम २७ कलम ६(दोन) द्वारे नव्याने दाखल केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे कलम १२(१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम १३(क) द्वारे घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम १३(६) द्वारे घातले.
५. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३(क) द्वारे घातले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ३(ग) द्वारे घातले.
७. १९७३ चा अधिनियम २७, कलम १४ द्वारे "विहित किमान दर" या शब्दाऐवजी घातले.
८. वरील अधिनियमाच्या कलम १४(२) द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले.

(३) शिकाऊ उमेदवार विहित करण्यात येईल अशा रजेस व ज्या आस्थापनेमध्ये तो प्रशिक्षण घेत असेल तेथे ज्या सुट्या ठेवलेल्या असतील त्यांस हक्कदार असेल.

इजेबद्दल भरपाई देण्याबाबतचे नियोक्त्याचे दायित्व. १६. जर एखाद्या शिकाऊ उमेदवाराला त्याच्या शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षणामुळे किंवा त्या ओघात उद्‌भवलेल्या अपघातामुळे शारीरिक इजा झाली तर, त्याचा नियोक्ता भरपाई देण्यास दायी असेल, आणि होईल तेथवर, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले फेरफार धरून 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' (१९२३ चा ८) याच्या उपबंधांनुसार ती ठरवून दिली जाईल.

वर्तणूक व शिस्त. १७. वर्तणूक व शिस्त यांविषयीच्या सर्व बाबतीत शिकाऊ उमेदवारावर, ज्या आस्थापनेत तो शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण घेत असेल त्या आस्थापनेतील [1][तत्सम प्रवर्गाच्या कामगारांना लागू असणारे] नियम व विनियम यांचे नियंत्रण राहील.

शिकाऊ उमेदवार हे प्रशिक्षार्थी आहेत, कामगार नव्हेत. १८. या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून इतर बाबतीत,—

(क) एखाद्या आस्थापनेत निर्देशित उदीमामध्ये शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेणारा प्रत्येक शिकाऊ उमेदवार हा कामगार नव्हे तर प्रशिक्षार्थी असेल ; आणि

(ख) कोणत्याही कायद्याचे कामगारांच्या संबंधातील उपबंध अशा शिकाऊ उमेदवाराला किंवा त्याच्या संबधात लागू होणार नाहीत.

नोंदी व प्रतिवेदने. १९. (१) प्रत्येक नियोक्ता, त्याच्या आस्थापनेमध्ये शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक शिकाऊ उमेदवाराच्या प्रशिक्षणाच्या प्रगतीबाबत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदी ठेवील.

(२) तसेच असा प्रत्येक नियोक्ता, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशी माहिती व प्रतिवेदने तशा विहित नमुन्यात, तशा विहित प्राधिकाऱ्यांकडे आणि तशा कालांतरागणिक सादर करील.

तंटे मिटवणे. २०. (१) नियोक्ता व शिकाऊ उमेदवार यांच्यामध्ये शिकाऊ उमेदवारीच्या संविदेतून उद्‌भवणारा कोणताही मतभेद किंवा तंटा निर्णयासाठी शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडे सोपविण्यात येईल.

(२) पोटकलम (१) खाली शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने दिलेल्या निर्णयामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला असा निर्णय तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, शिकाऊ उमेदवारी परिषदेकडे त्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल करता येईल आणि या प्रयोजनासाठी नियुक्त केलेली त्या परिषदेची समिती अशा अपिलाची सुनावणी करून निर्णय देईल.

(३) पोटकलम (२) खालील समितीचा निर्णय आणि फक्त अशाच निर्णयाच्या अधीनतेने, पोटकलम (१) खालील शिकाऊ उमेदवारी सल्लागाराचा निर्णय अंतिम असेल.

चाचणी घेणे व प्रमाणपत्र देणे आणि प्रशिक्षणाची समाप्ती. २१. (१) ज्याने प्रशिक्षणाचा कालावधी संपवला असेल त्या प्रत्येक [2][उदीम शिकाऊ उमेदवाराला] ज्या निर्देशित उदीमामध्ये [1][त्याने आपले शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण घेतलेले आहे] त्यामधील त्याची कार्यनिपुणता ठरविण्यासाठी राष्ट्रीय परिषदेतर्फे घेतली जाणारी चाचणी द्यावी लागेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या चाचणीमध्ये जो उत्तीर्ण होईल त्या प्रत्येक [2][उदीम शिकाऊ उमेदवाराला] राष्ट्रीय परिषदेद्वारा उदीमामधील कार्यनिपुणतेचे प्रमाणपत्र दिले जाईल.

[3][(३) प्रत्येक पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवाराची [4][तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवाराची] शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणामधील प्रगती नियोक्त्याला वेळोवेळी अजमावावी लागेल.

[5][(४) जो पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार किंवा तंत्रज्ञ (व्यावसायिक) शिकाऊ उमेदवार प्रादेशिक मंडळाचे समाधान होईल अशा प्रकारे आपले शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण संपवील त्या प्रत्येकाला त्या मंडळाद्वारे कार्यनिपुणतेचे प्रमाणपत्र देण्यात येईल.]]

नोकरी देणे व स्वीकारणे. २२. (१) नियोक्त्यावर त्याच्या आस्थापनेमधील ज्या कोणत्याही शिकाऊ उमेदवाराने आपला शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाचा कालावधी संपवलेला आहे त्याला कोणतीही नोकरी देण्याचे बंधन असणार नाही, तसेच शिकाऊ उमेदवारावर नियोक्त्याच्या हाताखालील नोकरी स्वीकारण्याचे बंधन असणार नाही.

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम १५ द्वारे घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे घातले.
४. १९८६ चा अधिनियम ४१, कलम ३ (क) द्वारे घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शिकाऊ उमेदवाराला शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर त्या नियोक्त्याकडे नोकरी करावी लागेल अशी जेव्हा शिकाऊ उमेदवारी संविदेमध्ये शर्त असेल तेव्हा असे प्रशिक्षण संपल्यानंतर, तो नियोक्ता, शिकाऊ उमेदवाराला योग्य नोकरी देण्यास बांधलेला असेल आणि तो शिकाऊ उमेदवार या नात्याने संविदेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल तितक्या कालावधीपुरता व तशा पारिश्रमिकाच्या बदल्यात नियोक्त्याची नोकरी करण्यास बांधलेला असेल :

परंतु, जेव्हा असा कालावधी किंवा पारिश्रमिक हे, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या मते वाजवी नसेल तेव्हा, तो असा कालावधी किंवा पारिश्रमिक यामध्ये, वाजवी होईल इतपत बदल करू शकेल व असा बदललेला कालावधी किंवा पारिश्रमिक म्हणजे तो शिकाऊ उमेदवार व तो नियोक्ता यांच्यामध्ये मत झालेला कालावधी किंवा पारिश्रमिक असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण तीन

## प्राधिकरणे

प्राधिकरणे. २३. (१) शासनाशिवाय आणखी या अधिनियमाखाली पुढील प्राधिकरणे असतील, ती अशी :—

(क) राष्ट्रीय परिषद,

(ख) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद,

(ग) राज्य परिषद,

(घ) राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद,

[१][(ङ) अखिल भारतीय परिषद,

(च) प्रादेशिक मंडळे,

(छ) तंत्रशिक्षणविषयक मंडळे किंवा राज्य परिषदा,]

[२][(ज)] केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार, आणि

[२][(झ)] राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार.

(२) प्रत्येक राज्य परिषद, राष्ट्रीय परिषदेला संलग्न असेल आणि प्रत्येक राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेला संलग्न असेल.

[३][(२क) प्रत्येक तंत्रशिक्षणविषयक मंडळ किंवा राज्य परिषद आणि प्रत्येक प्रादेशिक मंडळ हे, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेला संलग्न असेल.]

(३) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी प्रत्येक प्राधिकरण, या अधिनियमाखालील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली अथवा शासनाद्वारे त्याला नेमून देण्यात येतील ती कार्ये पार पाडील :

परंतु, राज्य परिषद, राष्ट्रीय परिषदेद्वारे तिला नेमून दिलेली असतील अशीही कार्ये पार पाडील आणि राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद [४][व तंत्रशिक्षणविषयक मंडळ किंवा राज्य परिषद] केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेद्वारे तिला नेमून दिलेली असतील अशीही कार्ये पार पाडील.

२४. (१) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद स्थापन करील व राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद स्थापन करील. परिषदा घटित करणे.

(२) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद ही [५][अध्यक्ष व उपाध्यक्ष] आणि पुढे दिलेल्या प्रवर्गांतील व्यक्तींमधून केंद्र सरकारला जितके सदस्य नियुक्त करणे इष्ट वाटेल तितके त्या शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करावयाचे अन्य सदस्य मिळून बनलेली असेल, ते प्रवर्ग असे :—

(क) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमधील नियोक्त्यांचे प्रतिनिधी,

(ख) केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे प्रतिनिधी [६]* * * *

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम १७ (एक) द्वारे घातले व नवीन क्रमांक दिला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १९ (तीन) द्वारे घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे "अध्यक्ष" या शब्दाऐवजी घातले.

६. वरील अधिनियमाच्या कलम १८ (दोन) (सहा) द्वारे "आणि" हा शब्द गाळण्यात आला.

(ग) [1][उद्योगधंदे, कामगारवर्ग व तंत्रशिक्षण] यांच्याशी संबंधित बाबींविषयी विशेष ज्ञान आणि अनुभव असणाऱ्या व्यक्ती, [2][आणि]

[3][(घ) अखिल भारतीय परिषदेचे व प्रादेशिक मंडळाचे प्रतिनिधी.]

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रवर्गामधून केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या त्या परिषदेच्या सदस्यांचा पदावधी, त्यांची कर्तव्ये पार पाडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्यांच्यामधील रिक्त पदे भरण्याची पद्धती हे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद ही [4][अध्यक्ष व उपाध्यक्ष] आणि पुढे दिलेल्या प्रवर्गातील व्यक्तींमधून राज्य शासनाला जितके सदस्य नियुक्त करणे इष्ट वाटेल तितके त्या शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करावयाचे अन्य सदस्य मिळून बनलेली असेल, ते प्रवर्ग असे :—

(क) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमधील नियोक्त्यांचे प्रतिनिधी,

(ख) केंद्र सरकारचे व त्या राज्य शासनाचे प्रतिनिधी [5]* * *,

(ग) [1][उद्योगधंदे, कामगारवर्ग व तंत्रशिक्षण] यांच्याशी संबंधित बाबींविषयी ज्ञान व अनुभव असणाऱ्या व्यक्ती, [2][आणि]

[3][(घ) तंत्रशिक्षणविषयक मंडळाचे किंवा राज्य परिषदेचे प्रतिनिधी.]

(५) पोटकलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रवर्गामधून राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, त्या परिषदेच्या सदस्यांचा पदावधी, त्यांची कर्तव्ये पार पडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्यांच्यामधील रिक्त पदे भरण्याची पद्धती हे राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करील त्याप्रमाणे असेल.

(६) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचे [4][अध्यक्ष व उपाध्यक्ष] आणि अन्य सदस्य यांना द्यावयाची काही फी व भत्ते असल्यास ते केंद्र सरकार निश्चित करील त्याप्रमाणे असतील व राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेचे [4][अध्यक्ष व उपाध्यक्ष] आणि अन्य सदस्य यांना द्यावयाची काही फी व भत्ते असल्यास ते राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

**पदे रिक्त असल्यामुळे कृती व कार्यवाही विधिबाह्य ठरावयाच्या नाहीत.**

२५. या अधिनियमाखाली राष्ट्रीय परिषद, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद, राज्य परिषद किंवा राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद यांनी केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही केवळ अशा परिषदेमध्ये कोणतेही पद रिक्त होते किंवा तिच्या घटनेमध्ये कोणतीही उणीव होती एवढ्याच कारणावरून प्रश्नास्पद केली जाणार नाही.

**शिकाऊ उमेदवारी सल्लागार.**

२६. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एखाद्या योग्य व्यक्तीची 'केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार' म्हणून नियुक्ती करील.

(२) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एखाद्या योग्य व्यक्तीची 'राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार' म्हणून नियुक्ती करील.

(३) केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार हा केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा सचिव असेल व राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार हा राज्य शिकाऊ उमेदवारी परिषदेचा सचिव असेल.

**उप आणि सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार.**

२७. (१) शासन, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी सहाय्य करण्यासाठी [6][अतिरिक्त, सह, प्रादेशिक, उप आणि सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार म्हणून योग्य व्यक्तींची नियुक्ती करू शकेल.]

(२) [7][प्रत्येक अतिरिक्त , सह, प्रादेशिक, उप किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार] हा, शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने त्याला नेमून दिली असतील अशी कर्तव्ये शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या नियंत्रणाच्या अधीनतेने पार पाडील.

**शिकाऊ उमेदवारी सल्लागार हे लोकसेवक असणे.**

२८. या अधिनियमाखाली नियुक्ती केलेला प्रत्येक शिकाऊ उमेदवारी सल्लागार आणि [7][प्रत्येक अतिरिक्त, सह, प्रादेशिक, उप किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार] हा, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम १८ द्वारे "उद्योग व कामगार" या ऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १८ (एक) (घ) द्वारे घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे " अध्यक्ष " या शब्दाऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम १८ (दोन) (सहा) द्वारे " आणि "शब्द वगळण्यात आला.
६. वरील अधिनियमाच्या कलम १९ (एक) द्वारे विशिष्ट शब्दाऐवजी घातले.
७. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे विशिष्ट शब्दाऐवजी घातले.

२९. (१) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, [१][केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेली जी व्यक्ती, केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून याबाबत लेखी प्राधिकृत झाली असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला],— प्रवेश, निरीक्षण इत्यादींच्या शक्ती.

(क) त्याला योग्य वाटतील असे काही मदतनीस मिळाल्यास त्यांच्यासह कोणत्याही आस्थापनेमध्ये किंवा तिच्या भागामध्ये कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करून निरीक्षण व तपासणी करता येईल ;

(ख) तेथे कामाला असलेल्या कोणत्याही शिकाऊ उमेदवाराची तपासणी करता येईल किंवा या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही, अभिलेख किंवा अन्य दस्तऐवज सादर करण्यास फर्मावता येईल आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तींच्या जागच्या जागी किंवा अन्यथा जबान्या घेता येतील ;

(ग) हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधाचे त्या आस्थापनेमध्ये पालन केले जात आहे किंवा काय याची खातरजमा करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी तपासणी व चौकशी करता येईल ;

(घ) विहित करण्यात येतील अशा शक्ती वापरता येतील :

परंतु, ज्या आस्थापनांच्या बाबतीत राज्य शासन हे, समुचित शासन असेल त्यांच्या संबंधात [२][राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेली जी व्यक्ती राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून याबाबत लेखी प्राधिकृत झाली असेल अशी अन्य व्यक्ती] यांनासुद्धा या पोटकलमाच्या खंड (क), (ख), (ग) किंवा (घ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही शक्ती वापरता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तीला, ज्याचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे तिला अपराधात गोवण्याकडे रोख असेल अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याची किंवा तशी जबानी देण्याची सक्ती केली जाणार नाही.

३०. (१) जर कोणताही नियोक्ता,— अपराध व दंड.

(क) एखादी व्यक्ती शिकाऊ उमेदवार म्हणून कामावर लावण्यास अर्ह नसताना तिला तसा उमेदवार म्हणून कामावर लावील तर; किंवा

(ख) शिकाऊ उमेदवारी संहितेच्या अटी व शर्ती यांचे पालन करण्यास चुकेल तर, किंवा

(ग) या अधिनियमाच्या उपबंधाखालील त्याने जितके शिकाऊ उमेदवार कामाला लावणे आवश्यक आहे त्या संख्येसंबंधीच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील तर,

तो सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) जर कोणताही नियोक्ता किंवा अन्य कोणतीही व्यक्ती,—

(क) कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्यास फर्मावण्यात आले असताना—

(एक) अशी माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्यास नकार देईल किंवा त्याबाबत उपेक्षा करील तर, किंवा

(दोन) जी माहिती किंवा प्रतिवेदन खोटे आहे आणि ते खोटे आहे हे एकतर स्वतःला माहीत आहे किंवा तसा स्वतःचा समज आहे किंवा ते खरे आहे असा स्वतःचा समज नाही अशी कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करील किंवा सादर करवील तर, किंवा

(तीन) तिने सादर करणे आवश्यक आहे अशी कोणतीही माहिती मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देईल किंवा त्यास खोटे उत्तर देईल तर; अथवा

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्राधिकृत असणारा कोणताही प्रवेश, निरीक्षण, तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी, [३][केंद्रीय किंवा राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला अथवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागारापेक्षा कमी दर्जा नसलेली जी व्यक्ती, केंद्रीय किंवा राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराकडून याबाबत लेखी प्राधिकृत झाली असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला], कोणतीही वाजवी सुविधा देण्यास नकार देईल किंवा त्याकामी बुद्धिपुरस्सर उपेक्षा करील तर; अथवा

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम २१ द्वारे "केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला" याऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २१(२) द्वारे "अन्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार" याऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २२, द्वारे "केंद्रीय किंवा राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागाराला" या शब्दांऐवजी घातले.

(ग) शिकाऊ उमेदवारी सल्लागाराच्या मान्यतेशिवाय शिकाऊ उमेदवारास जादा वेळ काम करावयास लावील तर; अथवा

(घ) शिकाऊ उमेदवारास त्याच्या प्रशिक्षणाशी संबंधित नसलेल्या अशा कोणत्याही कामावर ठेवील तर; अथवा

(ङ) शिकाऊ उमेदवाराला कामावारी तत्वावर पैसे देईल तर, अथवा

(च) शिकाऊ उमेदवाराला कोणत्याही उत्पादन सापेक्ष बोनसच्या किंवा प्रोत्साहन योजनेत सहभागी व्हावयास लावील तर,

ती व्यक्ती सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास किंवा, दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

कोणताही खास दंड उपबंधित केलेला नसेल त्याबाबतीत दंड.

३१. जर कोणत्याही नियोक्त्याने किंवा अन्य कोणाही व्यक्तीने, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले व त्यासाठी कलम ३० मध्ये कोणतीही शिक्षा उपबंधित केलेली नसेल तर, ती व्यक्ती, [1][एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल] इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

३२. (१) या अधिनियमाखाली अपराध करणारी व्यक्ती ही, कंपनी असल्यास, कंपनी, तसेच अपराध घडतेवेळी कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल प्रभारी असलेली व त्यासाठी कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती ही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखविली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती त्या अधिनियमाखाली कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो अपराध घडलेला आहे किंवा अपराध घडण्याचा कारण-संबंध त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र राहील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय, असा आहे व त्यामध्ये पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश होतो; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

अपराधांची दखल घेणे.

३३. कोणतेही न्यायालय, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांखाली केलेल्या अपराधाबाबत ज्या दिनांकी तो अपराध केला गेल्याचे अभिकथित केलेले आहे तेव्हापासून सहा महिन्यांच्या आत शिकाऊ उमेदवारी सल्लागाराने [2][किंवा शिकाऊ उमेदवारी उपसल्लागाराच्या श्रेणीच्या व त्यावरील श्रेणीच्या अधिकाऱ्याने] लेखी तक्रार केल्याखेरीज त्याची दखल घेणार नाही.

शक्तीचे प्रत्यायोजन.

३४. समुचित शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करता येईल की, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांखाली त्याने वापरण्यायोग्य असलेली कोणतीही शक्ती, त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा बाबींच्या संबंधात व अशा काही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने,—

(क) केंद्र सरकार हे, समुचित शासन असेल त्याबाबतीत, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा केंद्र शासनाला दुय्यम असणारा अधिकारी किंवा असे प्राधिकरण, राज्य शासन किंवा तसा राज्य शासनाला दुय्यम असणारा अधिकारी किंवा प्राधिकरण; आणि

(ख) राज्य शासन हे, समुचित शासन असेल त्याबाबतीत, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा राज्य शासनाला दुय्यम असणारा अधिकारी किंवा प्राधिकरण,

यांनी सुद्धा वापरण्यायोग्य असेल.

---

१ १९९७ चा अधिनियम ४, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या ४, कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३५. (१) संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या नियमांमधील शिकाऊ उमेदवारी परिषदेबाबतच्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, ज्या आस्थापनेच्या संबंधात केंद्र सरकार हे, समुचित शासन आहे तिच्यामधील निर्देशित उदीमातील शिकाऊ उमेदवारीच्या प्रशिक्षणाच्या संबंधात केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषद, असा आहे व ज्या आस्थापनेच्या संबंधात राज्य शासन हे समुचित शासन आहे तिच्यामधील निर्देशित उदीमातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या संबंधात राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद, असा आहे. उल्लेखांचा अर्थ लावणे.

(२) संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास, या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये शिकाऊ उमेदवारी सल्लागाराबाबत जो कोणताही उल्लेख असेल,—

(क) त्याचा अर्थ, ज्या आस्थापनेच्या संबंधात केंद्र सरकार हे समुचित शासन आहे तिच्यामधील निर्देशित उदीमातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या संबंधात केंद्रीय शिकाऊ उमेदवारी सल्लागार, असा आहे व ज्या आस्थापनेच्या संबंधात राज्य शासन हे समुचित शासन आहे तिच्यामधील निर्देशित उदीमातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या संबंधात राज्य शिकाऊ उमेदवारी सल्लागार, असा आहे ;

(ख) त्यामध्ये, जो [1][अतिरिक्त, सह, प्रादेशिक, उप किंवा सहायक शिकाऊ उमेदवारी सल्लागार] शिकाऊ उमेदवारी सल्लागाराची कलम २७—पोटकलम (२) या खाली स्वतःकडे नेमून दिलेली कार्ये करतो त्याचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.

३६. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

३७. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केंद्रीय शिकाऊ उमेदवारी परिषदेचा विचार घेऊन नंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे असे उपबंधित करता येईल की, अशा कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण हे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने [2][अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

३८. [निरसित.]

---

१. १९७३ चा अधिनियम २७, कलम २३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

## अनुसूची

(कलम १६ पहा)

**'शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१' याखालील शिकाऊ उमेदवारांना 'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' लागू करताना त्यातील आपरिवर्तने.**

'कामगार भरपाई अधिनियम, १९२३' यामध्ये,—

(१) कलम २ मधील—

(क) खंड (ड्) च्या ऐवजी पुढील खंड घालावा :—

"(ड्) "नियोक्ता" याचा अर्थ, ज्याने एक किंवा अधिक शिकाऊ उमेदवार ठेवलेले असतील असा 'शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१' मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला नियोक्ता, असा आहे; ";

(ख) खंड (ट) गाळावा;

(ग) खंड (ड्) ऐवजी पुढील खंड घालावा :—

"(ड्) "वेतन" याचा अर्थ, 'शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१'—कलम १३(१) खाली शिकाऊ उमेदवाराला प्रदेय असणारे पाठ्यवेतन, असा आहे; ";

(घ) खंड (ढ) ऐवजी पुढील खंड घालावा :—

"(ढ) "कामगार" याचा अर्थ, 'शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१' मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवार म्हणून कामाला लावलेली असून आपल्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाच्या ओघात जी दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही पदावर नेमलेली असेल अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे; "

(२) कलम १२ गाळावे;

(३) कलम १५ गाळावे;

(४) कलम २१ (१) चे परंतुक गाळावे;

(५) कलम २४ मधील "किंवा नोंदलेला व्यवसाय संघ" हे शब्द गाळावे;

(६) कलम ३० (१) मधील खंड (घ) गाळावा;

(७) दुसऱ्या अनुसूचीमधील खंड (सहा), (अकरा), (तेरा), (अठरा), (वीस), (बावीस), (चोवीस), (पंचवीस) व (बत्तीस) हे गाळावेत.

# THE APPRENTICES ACT, 1961

## शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| All India Council .. | अखिल भारतीय परिषद .. | [ S. 2(*a*)] |
| apprentice .. .. | शिकाऊ उमेदवार | [ S. 2(*aa*)] |
| apprenticeship .. .. | शिकाऊ उमेदवारी .. | [ S. 2(*aa*)] |
| Apprenticeship Advisor .. | शिकाऊ उमेदवारी सल्लागार .. | [ S. 2(*b*)] |
| Apprenticeship Council .. | शिकाऊ उमेदवारी परिषद .. | [S. 2(*c*) ] |
| apprenticeship training .. | शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण .. | [ S. 2(*aaa*)] |
| basic training .. .. | पायाभूत शिक्षण .. | [ S. 9(*m.n.*)] |
| Board or State Council of Technical Education | तंत्रशिक्षणविषयक मंडळ किंवा राज्य परिषद. | [ S. 2(*dd*)] |
| conscientiously and diligently | मनःपूर्वक व कार्यासक्तीने .. | [ S. 12(1)(*a*)] |
| designated trade .. | निर्देशित उदीम .. | [ S. 2(*e*)] |
| establishment in private sector | खाजगी क्षेत्रातील आस्थापना .. | [ S. 2(*h*)] |
| establihment in public sector | सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना .. | [ S. 2(*i*)] |
| graduate or technician apprentice | पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार | [ S 2(*j*)] |
| industry .. .. | उद्योगधंदा .. .. | [ S. 2(*k*) ] |
| institutional training .. | संस्थाविहित प्रशिक्षण .. | [ S. 6(*a*)] |
| National Council .. | राष्ट्रीय परिषद .. | [ S. 2(*l*) ] |
| output bonus or incentive scheme. .. | उत्पादनसापेक्ष बोनस किंवा प्रोत्साहन योजना. | [ S. 30(2)(*f*)] |
| practical and instructional classes. | प्रात्यक्षिकांचे व शिकवणीचे वर्ग .. | [ S. 12(1)(*b*)] |
| practical training .. | प्रात्याक्षिक प्रशिक्षण .. | [ S. 2(*d*)(1)(*aa*)] |
| Regional Board .. .. | प्रादेशिक मंडळ .. .. | [ S. 2(*mm*)] |
| related instruction .. | संबद्ध शिक्षणक्रम .. .. | [ S. 10(1)] |
| State Council | राज्य परिषद .. | [ S. 2(*o*)] |
| Subject field .. .. | विषयाचे व्यवहारक्षेत्र .. | [ S. 2(*e*)] |
| technical and supervisory persons. | तंत्रकुशल व पर्यवेक्षकीय व्यक्ती .. | [ S. 8(3*A*)(*i*)] |
| the oretical Knowledge .. | तात्त्विक ज्ञान .. .. | [ S. 10(2)] |
| trade apprentice .. | उदीम शिकाऊ उमेदवार .. | [ S. 2(*g*)] |
| trade .. .. | उदीम .. .. | [ Longtitle ] |
| trade tests .. .. | उदीम-चाचण्या .. .. | [ S. 6] |
| vocational trade | व्यावसायिक उदीम .. | [ S. 2(*v*)] |

# शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१

# THE APPRENTICES ACT, 1961

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखिल भारतीय परिषद | .. All India Council | [क. २(क)] |
| उत्पादनसापेक्ष बोनस किंवा प्रोत्साहन योजना | output bonus or incentive scheme | [क. १०(२) (च)] |
| उदीम .. | .. trade .. | [पूर्ण शिर्षक] |
| उदीम-चाचण्या .. | .. trade tests ... | [क. ६(क)] |
| उदीम शिकाऊ उमेदवार | .. trade apprentice ... | [क. २(छ)] |
| उद्योगधंदा .. | .. industry .. | [क. २(प)] |
| खाजगी क्षेत्रातील आस्थापना | .. establishment in private sector | [क. २(ज)] |
| तंत्रकुशल व पर्यवेक्षकीय व्यक्ती | .. technical and supervisory persons | [क. ८(३क) (ञ)] |
| तंत्रशिक्षणविषयक मंडळ किंवा राज्य परिषद | Board or State Council of Technical Education. | [क. २(घघ)] |
| तात्त्विक ज्ञान .. | .. theoretical knowledge .. | [क. १०(२)] |
| निर्देशित उदीम .. | .. designated trade .. | [क. २(ड)] |
| पदवीधर किंवा तंत्रज्ञ शिकाऊ उमेदवार | graduate or technician apprentice | [क. २(ञ)] |
| पायाभूत प्रशिक्षण .. | .. basic training | [क. ९-स. डी.] |
| प्रात्यक्षिक प्रशिक्षण .. | .. practical training | .. [क. २(घ) (१) (कक)] |
| प्रात्यक्षिकांचे व शिकवणीचे वर्ग | .. practical and instructional classes. | [क. १२(१) (ख)] |
| प्रादेशिक मंडळ .. | .. Regional Board | [क.२(बब)] |
| मन:पूर्वक व कार्यासक्तीने | .. conscientiously and diligently | [ १२(१) (क)] |
| राज्य परिषद .. | .. State Council .. | [क. २(म)] |
| राष्ट्रीय परिषद .. | .. National Council .. | [क. २(फ)] |
| विषयाचे व्यवहार क्षेत्र | .. subject field .. .. | [क. २(ढ)] |
| व्यावसायिक उदीम | .. vocational trade .. | [क. २(फ)] |
| शिकाऊ उमेदवार .. | .. apprentice .. .. | [क. २(कक) |
| शिकाऊ उमेदवारी .. | .. apprenticeship .. | [क. २(कक)] |
| शिकाऊ उमेदवारी परिषद | .. Apprenticeship Council | [क. २(ग)] |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | .. apprenticeship training .. | [क. २(ककक)] |
| शिकाऊ उमेदवारी सल्लागार | .. Apprenticeship Advisor .. | [क. २(ख)] |
| संस्थाविहित प्रशिक्षण | .. institutional training .. | [क. ६(क)] |
| संबद्ध शिक्षणक्रम | .. related instruction .. | [क. १०(१)] |
| सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना | .. establishment in public sector .. | [क. २(झ)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई